## विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडून,

### अनुसूची-V

महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधिचे उपबंध ( अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत ) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी विभागीय आयुक्तांनी प्रसिद्ध करावयाच्या अधिसूचनेचा नमुना.

### अधिसूचना

क्रमांक मशा/कार्या-५/प्रशासन/पेसा/एस.आर-**८५**/२०२३.—महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधिचे उपबंध ( अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत ) नियम २०१४ च्या नियम ४ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पाडा/ पाड्यांचा समूह, वस्ती/ वस्त्यांचा समूह, वाडी/वाड्यांचा समूह गाव म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येते;

आणि ज्याअर्थी, **विक्रमगड** तालुक्यातील **कऱ्हे – तलावली** ग्रामपंचायतीतील **उभीधोंडपाडा** पाडा/ वस्ती/ पाड्यांचा समूह / वस्त्यांचा समूह यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधिचे उपबंध ( अनुसुचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत ) नियम, २०१४ च्या नियम ४ प्रमाणे दिनांक **१० फेब्रुवारी २०२३** रोजी गाव जाहीर करण्यासंदर्भात ठराव केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, **उपविभागीय अधिकारी, वाडा** यांनी यासंदर्भात दिनांक **२८ एप्रिल २०२३** रोजी **कऱ्हे – तलावली** ग्रामपंचायतीत येणाऱ्या पाडा/वस्ती/पाड्याचा समूह/वस्त्यांचा समूह यांची संबंधित नोंदणीकृत मतदार व स्थानिक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चौकशी केली आहे;

आणि ज्याअर्थी, **जिल्हाधिकारी पालघर** यांनी चौकशी अंती संबंधित पाडा/ वस्ती/ पाड्यांचा समूह/ वस्त्यांचा समूह यांना गाव घोषित करण्याची शिफारस केलेली आहे.

आणि त्याअर्थी, मी, **डॉ. महेंद्र कल्याणकर, विभागीय आयुक्त, कोकण विभाग** पेसा नियमाच्या नियम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **विक्रमगड** तालुक्यातील **कऱ्हे – तलावली** ग्रामपंचायतीतील **उभीधोंडपाडा** येथे पाडा/ वस्ती/ पाड्यांचा समूह/वस्त्यांचा समूह यास पेसा नियम ४ अंतर्गत गाव घोषित करीत आहे.

सदर गावांच्या नैसर्गिक हद्दीचे तपशील तसेच संबंधित नैसर्गिक साधनांच्या वापराची पारंपरिक हद्द खालीलप्रमाणे आहेः—

| अ.क्र. | हद्दीचे तपशील | समूह नंबर/ कम्पार्टमेंट नंबर | इतर खुणा ( आवश्यक असल्यास ) |
|---|---|---|---|
| १. | पूर्वेस | ३६८ | काष्टी ओहळी कुंभीपाडा कोकेरपाडा |
| २. | पश्चिमेस | ३६८ | हेदचा खंडा/ रिठीचा टेप / जांभलोना |
| ३. | दक्षिणेस | ३६८,३६९ | गोवरदेव व पंगारवाडी |
| ४. | उत्तरेस | ३६८,३६९ | केंद्रीय राखीव वन व धामणी धरण |

सदर गाव जाहीर केल्यानंतर जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळून उरलेले क्षेत्र मूळ गाव म्हणून ओळखले जाईल. या गावासाठी पेसा अधिनियमातील तरतुदी व नियमातील तरतुदी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कोंकण भवन, नवी मुंबई,
दिनांक २ जानेवारी २०२४.

**डॉ. महेंद्र कल्याणकर,**
विभागीय आयुक्त, कोकण विभाग.